बुधवार दि.७ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३३९
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

दैनिक लोकनेता बीड

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढणार?

# अशक्य गोष्ट शक्य करणेच माझी ओळख



## विरोधकांना उत्तर देतांना काय म्हणाले अजितदादा?

**राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेची घोषणा केली. त्यानंतर या योजनेवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलीच जुंपली आहे. विरोधकांकडून सातत्याने या योजनेवरून सरकारवर टीका केली जात आहे. त्यावरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. अशक्य गोष्ट शक्य करणे हीच माझी ओळख असल्याचे म्हणत त्यांनी विरोधकांना सुनावले आहे. विशेष म्हणजे यंदाची निवडणूक ही महिलांच्या हितासाठी आणि विरोधात असणाऱ्यांमध्ये आहे असे अजित पवार म्हणाले आहेत.**



लोकनेता न्यूज नेटवर्क
मुंबई (वृत्तसंस्था)

अजित पवार यांनी यासंदर्भात एक ट्विट केले आहे. आपल्या ट्विटमध्ये त्यांनी म्हंटले आहे की, ''माझी लाडकी बहीण योजना टिकवणं शक्य नसल्याचं विरोधी पक्ष सांगत आहेत. मात्र अशक्य गोष्ट शक्य करणं हीच माझी ओळख आहे. तोच माझा स्वाभिमान आहे. ही कल्याणकारी योजना विरोधकांना बंद पाडायची आहे, तसं त्यांनी स्पष्ट देखील केलं आहे कारण, ही योजना यशस्वीपणे राबवणं अशक्य आहे असं त्यांचे भाकित आहे'', असे अजित पवार म्हणाले.तसेच यावेळी त्यांनी विरोधकांवर टीकाही केली आहे. ''येत्या काळात या योजनेला अधिक बळकटी देवून या योजनेची रक्कम वाढवण्यासाठी मी सर्वोतोपरी प्रयत्न करेन. ही निवडणूक महिलांच्या हितासाठी आणि विरोधात असणाऱ्यांमध्ये आहे'', असे अजित पवार म्हणाले.दरम्यान, महाराष्ट्र सरकारच्या वतीने या योजनेचा अर्ज भरण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदत दिली होती. मात्र राज्यभरातील महिलांची गर्दी पाहता आता सरकारने अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. आता ज्या-ज्या महिलांनी अद्याप या योजनेसाठी अर्ज दाखल केला नाही, त्यांना ३१ ऑगस्टपर्यंत या योजनेसाठी अर्ज करता येणार आहे. मुख्यमंत्री कार्यालयाकडून यासंदर्भात माहिती देण्यात आली आहे.अर्ज भरण्यासाठी आधारकार्ड, रेशनकार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, बँक पासबुक, अर्जदाराचा फोटो, अधिवास किंवा जन्म प्रमाणपत्र, लग्नाचे प्रमाणपत्र अशी कागदपत्रे आवश्यक आहेत. तसेच लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु.२.५० लाखापेक्षा जास्त नसावे अशी त्याची अट आहे.

# ९ ऑगस्ट क्रांती दिनी दिव्यांगांचा एल्गार मोर्चा व तीव्रआंदोलन

लोकनेता न्यूज नेटवर्क
नांदेड । बाजीराव गायकवाड



दिव्यांग सुधारीत कायदा RPWD ACT - २०१६ सह महाराष्ट्र राज्य दिव्यांग धोरण २०१८ ची नांदेड जिल्ह्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात आली नसल्याच्या निषेधार्थ व सर्व स्थानिक स्वराज्य संस्था नागरी स्वराज्य संस्था आणि आमदार खासदार यांच्याकडील दिव्यांगांचा राखीव निधी अद्याप खर्च न झाल्यामुळे तसेच बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांवर अद्याप कुठलीच कारवाई करण्यात आली नसल्यामुळे आणि संजय गांधी निराधार अनुदान योजना व राज्य आणि केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात दिव्यांगांसाठी कुठलीच वाढिव तरतुद न केल्याच्या निषेधार्थ व इतर शासन निर्णयीत न्याय मागण्यांसंदर्भात दिव्यांगांनी पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समीती नांदेड आणि दिव्यांग वृद्ध निराधार मित्र मंडळसह दिव्यांग आघाडी मुखेड यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक ९ ऑगस्ट रोजी क्रांती दिनी दिव्यांगांचा एल्गार मोर्चा व तिवृ स्वरूपाचे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.हा मोर्चा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून शुक्रवार दिनांक ९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद, महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी कार्यालयात धडकणार आहे त्यामुळे नांदेड शहर व संपूर्ण नांदेड जिल्ह्यातील दिव्यांगांनी या मोर्चात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन बेरोजगार दिव्यांग कल्याणकृती संघर्ष समीती नांदेड आणि दिव्यांग वृद्ध निराधार मित्र मंडळ महाराष्ट्र राज्यसह दिव्यांग आघाडी मुखेड तर्फे आज करण्यात आले आहे.

# शिक्षण विस्तार अधिकारी वसंत मेटकर यांची 'सेट' परीक्षेत 'हॅटट्रीक'

लोकनेता न्यूज नेटवर्क
कंधार । धोंडीबा मुंडे



कंधार पंचायत समितीच्या विविध विभागांत नेहमीच अभ्यासू व गुणवान अधिकारी सातत्याने नियुक्त होत असतात आपल्या कर्तव्यपरायण आणि अभ्यासू वृत्तीने ते कार्यातून इतरांना प्रेरणा देत असतात. सध्या गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती कंधार अंतर्गत बीट उस्माननगरचे उपक्रमशील शिक्षण विस्तार अधिकारी मा.वसंत मेटकर हे सुद्धा त्यापैकीच एक व्यक्तिमत्त्व आहे.

मा.वसंत मेटकर यांनी आत्तापर्यंत वेगवेगळ्या विषयांच्या पात्रता परीक्षा उत्तीर्ण केलेल्या आहेत. त्यांनी एम.ए.(मराठी) या विषयात राष्ट्रीय पात्रता परीक्षा,(नेट)परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे. त्यानंतर त्यांनी एम.ए.(शिक्षणशास्त्र) व एम.ए.(मराठी), या विषयात (सेट) परीक्षा उत्तीर्ण करून वेळोवेळी आपली पात्रता सिद्ध केलेली आहे.

यावर्षी यु.जी.सी.मान्यता प्राप्त सावित्रीबाई फुले विद्यापीठ,पुणे आयोजित राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) दि.७ एप्रिल २०२४ मध्ये घेण्यात आलेली होती,सदरील परीक्षेत शिक्षण विस्तार अधिकारी वसंत मेटकर यांनी एम.एस.डब्लू(समाजकार्य) या विषयाची राज्य पात्रता परीक्षा,(सेट) परीक्षा उत्तीर्ण करून पुन्हा एकदा तिहेरी (हॅटट्रिक) यश मिळवत, आपली बौद्धिक योग्यता सिद्ध केलेली आहे. यासाठी त्यांना गटशिक्षणाधिकारी मा.संजय येरमे सरांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभलेले आहे.

शिक्षणक्षेत्रातील एका ज्ञानजिज्ञासू अधिकाऱ्याने चिकाटी,मेहनत, व अथक परिश्रमाच्या माध्यमातून प्राप्त केलेले यश,हे नेहमीच शिक्षण क्षेत्रातील कार्यरत असलेल्या शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी यांना प्रेरणादायी असते, म्हणून राष्ट्रीय पात्रता परीक्षेसह,राज्य पात्रता परीक्षेत तिहेरी यश मिळवणारे मा.वसंत मेटकर यांचे पंचायत समिती कंधार अंतर्गत सर्व केंद्रप्रमुख,सर्व मुख्याध्यापक,व सर्व शिक्षकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# दिपभारती विद्यालयात थोर जीवशास्त्रज्ञ अलेक्झांडर फ्लेमिंग यांची जयंती साजरी



लोकनेता न्यूज नेटवर्क
दानापूर । राम शिंदे

दिपभारती विद्यालय दानापूर येथे थोर जीवशास्त्रज्ञ अलेक्झांडर प्लेमिंग यांची जयंती साजरी करण्यात आली .कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक श्री गवळी वाय. एस. यांनी त्यांच्या प्रतिमेचे पूजन केले व पुष्पहार अर्पण केला . अलेक्झांडर फ्लमिंग यांच्या जीवनावर विद्यालयाचे शिक्षक श्री

दोडवे एस. डी .यांनी त्यांच्या पेनिसिलीन या प्रतिजैविक औषधाच्या शोधाविषयी माहिती दिली.याप्रसंगी विद्यालयातील शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त इंदापूर येथे १६ ऑगस्टला नोकरी महोत्सवाचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क
इंदापूर । बबनराव धायतोंडे

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष, माजी मंत्री हर्षवर्धन (भाऊ) पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जिजाऊ इंदापूर तालुका फेडरेशनच्या वतीने भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन इंदापूर येथे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये शुक्रवारी (दि. १६) सकाळी ९ ते सायं. ४ या वेळेत करण्यात आले आहे, अशी माहिती पुणे जिल्हा भाजप युवा मोर्चाच्या अध्यक्षा अंकिता पाटील-ठाकरे यांनी इंदापूर येथे दिली. रोजगार निर्मितीसाठी कुशल व रोजगार क्षम युवकांसाठी नोकरी महोत्सव संधी असून, युवक वर्गाने या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहनही

## अंकिता पाटील-ठाकरे यांची माहिती



अंकिता पाटील-ठाकरे यांनी यावेळी केले. तसेच नोकरीपूर्व मुलाखत प्रशिक्षण शिबीरे खालील ३ ठिकाणी आयोजित करण्यात आले आहेत.

भिगवण : सोमवार दि.१२ऑगस्ट स.१० ते दु.१, स्थळ :- कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, भिगवण.

बावडा : मंगळवार दि.१३ऑगस्ट स.१० ते दु १, स्थळ:-श्रीमती रत्नप्रभादेवी पाटील महाविद्यालय, बावडा

इंदापूर : बुधवार दि.१४ ऑगस्ट स.१० ते दु.१, स्थळ :-कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर.तरी इच्छुक युवकांनी बायोडाटा व सर्व आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन अंकिता - ठाकरे यांनी केली आहे.

झाडे लावा झाडे जगवा



## चारोळी

अपेक्षाचे गाठोडं
कुठेपर्यत वाहणार
जगणं राहुनी गेल्यावर
स्वतःला कशात पाहणार.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# धर्मपरिवर्तन कर,नाही तर तलाख दे,म्हणून पोलीस अधिकाऱ्याच्या कुटूंबियांकडून विवाहितेचा अतोनात छळ

लोकनेता न्यूज नेटवर्क
आष्टी । राजू म्हस्के

धर्म परिवर्तन करण्यासाठी दबाव टाकला. तसेच पैसे दे किंवा तलाक दे, असे म्हणत महिला पोलिस अधिकाऱ्याचा सासरच्यांनी छळ केला.या प्रकरणी पतीसह सासरच्या सात जणांविरोधात आष्टी पोलिस ठाण्यात ३ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिला ही पोलिस अधिकारी असून त्यांचा ११ ऑक्टोबर २०१८ रोजी स्पेशल मॅरेज ४ अँक्ट कायद्यानुसार आष्टीतील तरुणासोबत प्रेम विवाह झाला होता.त्यांचा पती हा सिदपूर (गुजरात) येथे बँकेत नोकरीस होता.बँकेतील अफरातफरीच्या प्रकरणात त्याला १३ सप्टेंबर २०२१ रोजी निलंबित करण्यात आले. त्यानंतर काही दिवसांनी त्याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हाही दाखल झाला होता. याच वर्षी महिला पोलिस अधिकाऱ्यांचे सिझेरियन होऊन मुलगा झाला.प्रसूतीच्या सहा दिवसांनंतरच पतीने त्यांना मारहाण केली.त्यानंतर मे २०२२ मध्ये पतीच्या नाकाच्या शस्त्रक्रियेसाठी सासरा,सासू, नणंद हे आष्टीतून गुजरातला आले.तेथे तू मुस्लीम नसल्याने आमच्यामध्ये राहू शकत नाही. तुला आम्ही मान्य करणार नाही, अशा धमक्या दिल्या.लेकरू जरी झाले तरी तुझा संसार होऊ देणार नाही.तू मान्य नाहीस आणि तुझा घटस्फोट होण्यास भाग पाडेल.तू मुलाला सोड, असे म्हणून सासूने पीडितेला शिवीगाळ केली.काही दिवस पती-पत्नी विभक्त राहिले.परंतु, नंतर समेट घडून आला.त्यानंतर तुला मुस्लीम धर्म स्वीकारावा लागेल.तू धर्म परिवर्तन केले नाही,तर तुला तलाक द्यावा लागेल,अशी धमकी देत त्रास दिला.तसेच पीडितेलाही तू पोलिस खात्यात नोकरीला आहेस,तर तुझ्या नोकरीवर गदा आणेन.तुझ्या मागे एसीबीची चौकशी लावेन.तुलाही निलंबित करेन.जर तू माझा धर्म स्वीकारला नाही,तर मी तुला तलाक देईन.असे म्हणत पतीनेही पीडितेला मारहाण करत छळ केला. त्यानंतर २ ऑगस्ट २०२४ रोजी पतीने दुसरे लग्न केल्याचे समजताच महिला पोलिस अधिकाऱ्याने आष्टी पोलिस ठाणे गाठत तक्रार दिली. त्यावरून पतीसह सासरच्या सात जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.



# लाडकी बहीण योजनेसाठी जास्तीत जास्त महिलांची नोंदणी करा-आयुक्त डॉ.निधी पाण्डेय

## उमरखेड येथे विविध बाबींचा आढावा;दिव्यांगांना लाभ मंजुरीपत्रांचे वितरण;रेशीम शेतीला भेट व शेतकऱ्यांशी संवाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**यवतमाळ | सय्यद रहिम राजा**

शासनाने महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. महिलांच्या आर्थिक उत्थानासाठी ही योजना महत्वाची ठरणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त महिलांची नोंदणी करा, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ.निधी पाण्डेय यांनी केल्या.विश्रामगृह उमरखेड येथे आयुक्तांनी विविध विषयांचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी सदर सूचना केल्या. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, अप्पर जिल्हाधिकारी अनील खंडागळे, उपायुक्त शामकांत म्हस्के, उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे, नगरपालिका प्रशासनचे सहाय्यक आयुक्त निलेश जाधव, तहसीलदार आर.यु.सुरडकर, मुख्याधिकारी महेश जामनोर आदी उपस्थित होते.विभागीय आयुक्तांनी मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेसह मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, सैनिक हो तुमच्यासाठी, एक हात मदतीचा-दिव्यांगाच्या कल्याणाचा आदी योजना, उपक्रमांचा देखील आढावा घेतला. सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणाऱ्या या योजना आहेत. विभागात या योजना, उपक्रमांची चांगल्या पद्धतीने अंमलबजावणी करुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना सामावून घ्यावे असे, आयुक्तांनी सांगितले.बैठकीनंतर आयुक्तांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयास भेट दिली. या ठिकाणी महसूल संवर्गातील कार्यरत तथा सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या महसूल सप्ताहांतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ मंजूरी पत्रांचे वितरण केले. उमरखेड विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्राचे विभाजन, मतदान केंद्राची इमारत,



मतदान केंद्राचे नांव बदलणे तसेच नवीन मतदार नोंदणी, मतदार नावाची दुरुस्ती करणे ईत्यादी विषयाबाबत देखील आढावा घेतला. शे.तनवीर शे.मुबीन, अंजली रामराव निरडवार, फिजानाज शे.मुमताज या दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ मंजूरी पत्राचे वितरण करण्यात आले.

**रेशीम शेतीची पाहणी**

उमरखेड नजीक असलेल्या सुकळी येथे मनोहर शिवराम वानखेडे हे शेतकरी गेल्या काही वर्षांपासून उत्तमप्रकारे रेशीम शेती करत आहे. विभागीय आयुक्त डॉ.निधी पाण्डेय यांनी त्यांच्या रेशीम शेतीस भेट देऊन पाहणी केली. या शेतकऱ्याने एक एकर क्षेत्रात तुतीची लागवड केली आहे. प्रत्येक वर्षी ते रेशीम कोषाच्या एकून चार बॅच घेतात. यातून वर्षाला साधारणपणे २ लाख ५० हजार रुपयांचे उत्पन्न होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**आर्णी येथे नुकसानीची पाहणी**

विभागीय आयुक्तांनी आर्णी येथे दिग्रस मार्गानजीक अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेत पिकांची पाहणी केली. गेले काही दिवस सतत पाऊस होत असल्याने लगतच्या नाल्याला पुर येऊन निशाद काटपिलवार व रंजना काटपिलवार तसेच रियाज शेख हे वाहत असलेल्या शेत पिकांचे नुकसान झाले आहे. या पिकांची पाहणी करत शेतकऱ्यांशी आयुक्तांनी संवाद साधला.

# शेतकरी कुटुंबातील कु.पुनम कृष्णा बोबडे पोलीस उपनिरीक्षक पदी

## यश प्राप्त केल्याबद्दल बोबडे कुटुंबीयांचा सत्कार संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पैठण | प्रतिनिधी**

पैठण तालुक्यातील वाहेगाव येथील एका शेतकरी कन्येची पोलिस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल तिचा व तिच्या कुटुंबीयांचा सत्कार रेणुकादेवी शरद सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विलास बापू भुमरे पाटील यांच्या हस्ते मंगळवार दिं.६. रोजी करण्यात आला.

याप्रसंगी कु.पुनम कृष्णा बोबडे व तिच्या कुटुंबीयाचा सत्कार करण्यात आला यावेळी रेणुकादेवी शरद सहकारी साखर



कारखान्याचे चेअरमन विलास बापू भुमरे, खरेदी विक्री संघाचे संचालक अंकुश जिजा बोबडे पाटील,ग्रामसंजीवनी अर्बन पतसंस्थेचे चेअरमन अर्जुन बोबडे पाटील, ग्रामविकास अधिकारी सागर डोईफोडे,नवगावचे सरपंच किशोर चौधरी,माजी उपनगराध्यक्ष शहादेव पाटील लोहारे, कृष्णा बोबडे,चंद्रभान जगताप, यशवंत नरवडे, परमेश्वर बोबडे, रामेश्वर बोबडे, शिवाजी बोबडे, भगवान सोनवणे, संतोष सोनवणे, संदीपान शिंदे, कल्याण बोबडे, सुभाष शेळके, माणिक मिसाळ, उपसरपंच राजु मोहिते सह आदी उपस्थित होते.

# पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झालेले स्वरूप भुजबळ यांचा इंदापूर महाविद्यालयामध्ये सत्कार

## माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील आणि राजवर्धन पाटील यांनी दिल्या शुभेच्छा





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर | बबनराव धायतोंडे**

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील कला,विज्ञान वाणिज्य महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जीवन सरवदे आणि उपप्राचार्य प्रा.दत्तात्रय गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकत्याच लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमधून पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झालेले स्वरूप भरत भुजबळ यांचा महाविद्यालयाच्या शाहीर अमर शेख सभागृहामध्ये सत्कार करण्यात आला. स्वरूप भुजबळ हे वरिष्ठ महाविद्यालयाचे क्रीडासंचालक डॉ.भरत भुजबळ यांचे चिरंजीव आहेत.पोलीस उपनिरीक्षक स्वरूप भुजबळ यांनी विद्यार्थ्यांना आपले अनुभव सांगितले आणि विद्यार्थ्यांना ध्येयपूर्तीसाठीचे मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी ११ वी,१२ वी पासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी करावी.योग्य प्रयत्नाने आपल्याला हे यश संपादन करता येते असे मत पोलीस उपनिरीक्षक स्वरूप भुजबळ यांनी यावेळी व्यक्त केले.महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.दत्तात्रय गोळे, डॉ.भरत भुजबळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सुनील सावंत यांनी केले.यावेळी क्रीडा शिक्षक प्रा.बापू घोगरे आणि सहकारी प्राध्यापक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रोहिदास भांगे यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रा.राजीव शिरसट यांनी मानले.

# १५ फुटी राखी जिल्हाधिकारी राऊत यांच्या हस्ते सीमेवर होणार रवाना

## मन्याड-गोदा खोऱ्याचा अभिनव उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**

भारत मातेचे रक्षण करणारा शूर सैनिक सीमेवर प्रतिकूल परिस्थितीत कर्तव्य बजावतो.त्यांच्या प्रति असलेला भक्तीभाव दिव्यांग कलावंत दरवर्षी रक्षाबंधन सणानिमित्त सीमेवरील जवानांना राखी पाठवण्याचा उपक्रम राष्ट्रभक्त सहकाऱ्यांच्या माध्यमातून राबवित असतो.

यंदा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते दि.६ ऑगस्ट रोजी १५ फुटी महाराखीसह सदिच्छा पत्र सीमेवर पाठविण्यात येणार आहे.

दिव्यांग कलावंत दत्तात्रय एमेकर यांनी सुंदर अक्षर कार्यशाळा कंधार व राष्ट्रभक्त मित्र परिवाराच्या वतीने १० वर्षापूर्वी नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केला.मन्याड-गोदावरी खोऱ्यातील रक्षाबंधन सणानिमित्त भारतीय जवान आपल्या परिवारापासून कोसोदूर राहून भारत मातेच्या सीमेचे रक्षण करतात. त्यामुळे शूर सैनिकांना राख्या व सदिच्छा पत्र पाठवले जाते.शालेय भगीनींच्या ३,३३३ सदिच्छा पत्र व ३,३३३ राख्या सोबत १५ फुटी महाराखी हा देशभक्तीचा स्फूर्तिदायी उपक्रम राबवलो जातो. यावर्षी नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिजित



राऊत यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथून भारतीय सीमेवरील सैनिकांना दि.०६ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ वाजता राख्या भारतीय डाक विभागामार्फत पाठविण्यात येणार आहेत. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, संयोजक दत्तात्रय एमेकर,कंत्राटदार वैजनाथ सादलापूरे,डॉ.रामभाऊ तायडे,डॉ.गंगाधर तोगरे,प्रा.संजय म्हेत्रे,राजेश्वर कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

ए.पी.ओ २६२ रेजिमेंटचे कमांडिंग ऑफिसर चंदन कुमार व सुभेदार अमरसिंह साहू आणि हवालदार शिवहार कागणे भोजुचीवाडीकर यांच्या बटालियनकडे राख्या व सदिच्छा पत्रे रवाना करण्यात येणार आहेत.

## महायुतीच्या जागा वाटपात आष्टीची जागा घड्याळालाच

# कार्यकर्ता मेळाव्या आ.आजबेनी दिला कार्यकर्त्यांना विश्वास

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | राजू म्हस्के**

विधानसभेच्या निवडणुका जवळ आल्या असून कार्यकर्त्यांनी कामाला लागावे काही झालं तरी महायुतीच्या जागा वाटपात आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाची विधानसभेची जागा ही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट म्हणजेच घड्याळालाच सुटणार आहे यात कुठलीही शंका नाही म्हणून कार्यकर्त्यांनी कसल्याही भूलथापांना बळी न पडता निवडणुकीच्या कामाला लागावे असा विश्वास आमदार बाळासाहेब आजबे यांनी शिराळ येथे झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना सांगितले.

रविवार दिनांक ४ ऑगस्ट रोजी शिराळ येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यकर्त्यांचा भव्य मेळावा आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला यावेळी राष्ट्रवादी



काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष काकासाहेब शिंदे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉक्टर शिवाजी राऊत, हरिभाऊ दहातोंडे ,परसराम मराठे, संदीप सुंबरे युवा नेते महेश आजबे ,यश आजबे यांच्यासह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार आजबे म्हणाले की आपण गेल्या पाच वर्षाच्या कार्यकाळामध्ये मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकास कामे आणले आहेत हे विकास कामाच्या जोरावर व जनतेच्या विश्वासावर आपण येणारी विधानसभा ही घड्याळ चिन्हावरच लढवणार असून तसा शब्दही आपल्याला वरिष्ठांनकडून देण्यात आलेला आहे त्यामुळे कोणी काही म्हणत असले तरी महायुतीच्या जागा वाटपामध्ये आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाची विधानसभेची जागा ही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला सुटणार असून कार्यकर्त्यांनी कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नये निवडणूक जवळ आली असल्यामुळे आपापल्या पद्धतीने कामाला लागावे आपण गेल्या पाच वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात विकासकामे केल्यामुळे जनतेचा आपल्यावर विश्वास बसला आहे प्रत्येक गावामध्ये आपण विकास कामे केली आहेत गावागावात आपल्याला सामान्य जनतेतून पाठिंबा मिळत आहे गेल्या आठवड्यापासून आपण गाव भेट दौरा सुरू केला असून या गाव भेट दौऱ्यामध्येही प्रत्येक गावातून आपल्याला मोठा पाठिंबा मिळत आहे यावरूनच जनता आपल्या पाठीशी असल्याचे लक्षात येत आहे आपण गेल्या पाच वर्षांमध्ये कोणाचेही वाईट चिंतीले नाही व कोणाला त्रास होईल असे एकही काम केले नाही सच्चा कार्यकर्त्यांची फळी आणि सर्वसामान्य जनता हे आपल्याबरोबर आहे तरीसुद्धा गाफील न राहता आत्तापासूनच आपण कामाला लागले पाहिजे ही जागा शंभर टक्के घड्याळाला सुटणार आहे असा विश्वास यावेळी बोलताना आमदार बाळासाहेब आजबे यांनी कार्यकर्त्यांना दिला.

# पीएमश्री योजनेंतर्गत डोंगर किन्ही शाळेकडे शिक्षण विभाग आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष-डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | विजय रोडे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घोषणेनुसार राज्यातील ८४६ शाळांची निवड करण्यात आली होती.पाटोदा तालुक्यातुन गेल्यावर्षी एकमेव डोंगर किन्ही येथील जिल्हा परिषद शाळेची निवड करण्यात आली. पीएमश्रीच्या शाळा आदर्श विद्यालये असतील पुर्णपणे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांशी (छएझ) सुसंगत असतील शाळांचे पुर्णपणे आधुनिकीकरण केले जाईल, इमारतींचीही सुधारणा पायाभूत सुविधेनुसार केली जाईल.स्मार्ट क्लास रूम,संगणक, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय येथे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे.शाळांमध्ये डिस्कव्हरी ओरिएंटेड आणि लर्निंग सेट्रीक टीचिंग मेथड राबविण्यात येणार असुन नवीन गोष्टी शिकण्याची आणि शोधण्याची क्षमता मुलांमध्ये विकसित होईल अशा पद्धतीने शिक्षण देण्याचा अंतर्भाव आहे.

उच्च दर्जाचे गुणात्मक शिक्षण देणाऱ्या सर्वोत्कृष्ट शाळा म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून १ कोटी ८८ लाख रूपयांच्या निधीची तरतूद ५ वर्षासाठी करण्यात आली. अभ्यासक्रम,अध्यापनशास्त्र, मुल्यमापन पायाभूत सुविधा,मानव संसाधन, शालेय नेतृत्व, समावेशक पद्धती व समाधान,व्याधस्थापन, देखरेख आणि प्रशासन लाभार्थी समाधान यांना प्राधान्य दिले जाणार असुन

योजनेची अंमलबजावणी शालेय शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती, जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. मात्र डोंगर किन्ही येथील जिल्हा परिषद शाळेकडे मात्र शिक्षण विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.डोंगर किन्ही माध्यमिक जिल्हा परिषद शाळा ५ ते १० वी पर्यंत असुन सध्या २६५ विद्यार्थी पटसंख्या आहे. नविन बांधण्यात आलेल्या शाळेत ६ वर्गखोल्या बांधण्यात आलेल्या आहेत.मात्र ५ वी ते १० वी वर्ग आणि यासोबतच प्रयोगशाळा, संगणक, ग्रंथालय,कार्यालय, परीक्षा विभाग, शालेय




पोषण आहार, स्टोअर रूम आदी आणखी ६ खोल्यांची आवश्यकता आहे. महत्वाची बाब म्हणजे शाळेसमोर मोठा ओढा असल्याने मुलांच्या सुरक्षिततेसाठी संरक्षक भिंतीचे काम होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शाळेत ९ शिक्षक कार्यरत असुन शाळेत २ पदवीधर शिक्षकांची पदे रिक्त असल्याने काही वर्ग नव्या शाळेत भरवले तरी शिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण होणार आहेत.जिल्हा परिषद सदस्य झाल्यानंतर डोंगरकिन्हीकरांची जुन्या शाळेचा न्यायालयीन वाद सुरू असुन सध्याची ईमारत अपुरी पडत असल्याने नविन शाळा बांधण्याची मागणी केल्यानंतर तत्कालीन शिक्षण सभापती राजेभाऊ देशमुख यांच्या कडून नविन शाळा बांधकामासाठी मंजुरी घेतली. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली.आ.सुरेश आण्णा धस यांच्या कडुन त्यासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे.शाळेचे कामाचे अंदाजपत्रक अडीच कोटी रूपयांचे असुन उर्वरित आवश्यक कामांसाठी निधीची आवश्यकता असुन पाठपुरावा सुरू असुन शाळा कार्यान्वित होणं गरजेचं असल्याचं जिल्हा परिषद सदस्य प्रकाश कवठेकर यांनी सांगितले.जिल्हा परिषदेच्या सध्या सुरू असलेल्या शाळेत जागा अपुरी असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. उर्वरित आवश्यक बांधकामासाठी निधी देण्यात यावा आणि २ शिक्षक आणि २ शिपाई यांची रिक्त पदे भरण्यात यावीत यासाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरू आहे. आष्टी करांच्या राजकीय श्रेयवादात मात्र पाटोदा तालुक्याकडे दुर्लक्ष होत असुन कोट्यवधी खर्चून बांधण्यात आलेली जिल्हा परिषद माध्यमिक शाळा असुन अडचण आणि नसुन खोळंबा अशी अवस्था झाली आहे.अशी खंत सरपंच आण्णासाहेब येवले यांनी व्यक्त केली.

# कोट्यवधींचा निधी खर्चुन डोंगरकिन्हीची जि.परिषद शाळा २ वर्षांपासून धुळखात पडुन

## पीएमश्री योजनेंतर्गत शाळेकडे लोकप्रतिनिधी आणि शिक्षण विभागाचे दुर्लक्ष–डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही येथील कोट्यवधीं रुपये खर्चून बांधण्यात आलेली जिल्हा परीषदेची माध्यमिक शाळा शिक्षण विभागाच्या ढिसाळ कारभार आणि राजकीय श्रेयवादातुन दुर्लक्षित झाल्याने २ वर्षांपासून धुळखात पडुन असुन सध्या १९६५ साली बांधण्यात आलेल्या जुन्या ईमारतीत भरत असुन अपुऱ्या जागेमुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे तर भिंतीला तडे गेलेले असुन त्या मुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. शाळेसाठी आवश्यक संरक्षण भिंत, पिण्याचे पाणी, वीज पुरवठा, संगणक प्रयोगशाळा, ग्रंथालय आदिसाठी आवश्यक निधींची तरतुद करून उर्वरित काम तातडीने पूर्ण करून नविन जागेत स्थलांतरित करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर




यांनी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे. या वेळी गणेश ढवळे म्हणाले की पीएमश्री योजनेंतर्गत डोंगर किन्ही शाळेकडे शिक्षण विभाग आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष झालेले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घोषणेनुसार राज्यातील ८४६ शाळांची निवड करण्यात आली होती. पाटोदा तालुक्यातुन गेल्यावर्षी एकमेव डोंगरकिन्ही येथील जिल्हा परिषद शाळेची निवड करण्यात आली.पीएमश्रीच्या शाळा आदर्श विद्यालये असतील पुर्णपणे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांशी (छएझ) सुसंगत असतील शाळांचे पुर्णपणे आधुनिकीकरण केले जाईल, इमारतींचीही सुधारणा पायाभूत सुविधेनुसार केली जाईल. स्मार्ट क्लास रूम, संगणक, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय येथे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. शाळांमध्ये डिस्कव्हरी ओरिएंटेड आणि लर्निंग सेट्रीक टीचिंग मेथड राबविण्यात येणार असुन नवीन गोष्टी शिकण्याची आणि शोधण्याची क्षमता मुलांमध्ये विकसित होईल अशा पद्धतीने शिक्षण देण्याचा अंतर्भाव आहे.

उच्च दर्जाचे गुणात्मक शिक्षण देणाऱ्या सर्वोत्कृष्ट शाळा म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून १ कोटी ८८ लाख रूपयांच्या निधीची तरतूद ५ वर्षासाठी करण्यात आली. अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र, मुल्यमापन पायाभूत सुविधा, मानव संसाधन, शालेय नेतृत्व, समावेशक पद्धती व समाधान, व्याधस्थापन, देखरेख आणि प्रशासन लाभार्थी समाधान यांना प्राधान्य दिले जाणार असुन योजनेची अंमलबजावणी शालेय शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती, जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. मात्र डोंगरकिन्ही येथील जिल्हा परिषद शाळेकडे मात्र शिक्षण विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

### संरक्षक भिंत, प्रयोगशाळा, संगणक, ग्रंथालय, कार्यालय, परीक्षा विभाग आदिंसाठी खोल्यांची आवश्यकता

डोंगरकिन्ही माध्यमिक जिल्हा परिषद शाळा ०५ ते १० वी पर्यंत असुन सध्या २६५ विद्यार्थी पटसंख्या आहे. नविन बांधण्यात आलेल्या शाळेत ०६ वर्गखोल्या बांधण्यात आलेल्या आहेत. मात्र ०५ वी ते १० वी वर्ग आणि या सोबतच प्रयोगशाळा, संगणक, ग्रंथालय, कार्यालय, परीक्षा विभाग, शालेय पोषण आहार, स्टोअर रूम आदी आणखी ०६ खोल्यांची आवश्यकता आहे. महत्वाची बाब म्हणजे शाळेसमोर मोठा ओढा असल्याने मुलांच्या सुरक्षिततेसाठी संरक्षक भिंतीचे काम होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शाळेत ०९ शिक्षक कार्यरत असुन शाळेत ०२ पदवीधर शिक्षकांची पदे रिक्त असल्याने काही वर्ग नव्या शाळेत भरवले तरी शिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण होणार आहेत. **–घायाळ(प्रभारी मुख्याध्यापक)**

### डोंगरकिन्ही माध्यमिक जिल्हा परिषद शाळा कार्यान्वित होणे गरजेचे

जिल्हा परिषद सदस्य झाल्यानंतर डोंगरकिन्हीकरांची जुन्या शाळेचा न्यायालयीन वाद सुरू असुन सध्याची ईमारत अपुरी पडत असल्याने नविन शाळा बांधण्याची मागणी केल्यानंतर तत्कालीन शिक्षण सभापती राजेभाऊ देशमुख यांच्या कडून नविन शाळा बांधकामासाठी मंजुरी घेतली. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली. आ.सुरेश आण्णा धस यांच्या कडुन त्या साठी ०१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. शाळेचे कामाचे अंदाजपत्रक अडीच कोटी रूपयांचे असुन उर्वरित आवश्यक कामांसाठी निधीची आवश्यकता असुन पाठपुरावा सुरू असुन शाळा कार्यान्वित होणे गरजेचं आहे. **–प्रकाश कवठेकर (जिल्हा परिषद सदस्य)**

### आष्टीकरांच्या राजकीय श्रेयवादात कोट्यवधींची शाळेची इमारत असुन अडचण नसुन खोळंबा

जिल्हा परिषदेच्या सध्या सुरू असलेल्या शाळेत जागा अपुरी असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. उर्वरित आवश्यक बांधकामासाठी निधी देण्यात यावा आणि २ शिक्षक आणि २ शिपाई यांची रिक्त पदे भरण्यात यावीत या साठी शासन दरबारी पाठपुरावा सुरू आहे. आष्टीकरांच्या राजकीय श्रेयवादात मात्र पाटोदा तालुक्याकडे दुर्लक्ष होत असुन कोट्यवधी खर्चून बांधण्यात आलेली जिल्हा परिषद माध्यमिक शाळा असुन अडचण आणि नसुन खोळंबा अशी अवस्था झाली आहे. याची खंत वाटते आहे. **–आण्णासाहेब येवले (सरपंच डोंगरकिंन्ही)**

# लोणार सरोवरात ३० वर्षीय युवकाचा गळा दाबून खून प्रकारणातील –२आरोपी अटक




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

लोणार –सरोवरतील यज्ञनेश्वर मंदिरा जवळील दर्गा रोड बाजूला घनदाट जगलात शेलू जी. परभणी येथील ३० वर्षीय युवकाचा गळा दाबून खून केल्याची घटना दि. ५ आगस्ट रोजी रात्री ११ वाजे दरम्यान उघडीस आली होती यामुळे लोणार शहरात एकच खळबळ उडाली होती.

परभणी जिल्यातील शेलू तालुक्यातील २७ वर्षीय युवक अर्जुन दिलीप रोडगे रा.रवळगाव हा दि. २ आगस्ट पासून घरी न आल्याने त्याचे वडील दिलीप बाबाराव रोडगे यानी शेलू पोलीस स्टेशन ला बेपत्ता झाल्याची ३ आगस्ट रोजी तक्रार दाखल केली. पोलीसानी तपासाची चक्रे जलद गतीने फिरविली असता. मृतक अर्जुन रोडगेचे गावातीलच २९ वर्षीय अर्चना विठ्ठल सरोदे या महिलेशी अनेतिक संबंध असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सदर महिलेला ताब्यात घेऊन. पोलिसी खाक्या दाखवीताच ती पोपटा सारखी बोलू लागली. तिने साथी दाराच्या मदतिने आपल्या प्रिय कराचा रुमालाच्या सहह्याने गळा आवळून खून केल्याची कबुली दिली. सदर खून लोणार सरोवरात करून मृत्यूदेह घनदाट जंगलातील जाळीत फेकून दिल्या ची माहिती पोलीसांना देताच शेलू पोलीसाचे पथक दि. ५ आगस्ट रोजी रात्री १० वाजता महिला आरोपी अर्चना सरोदे हिला लोणार सरोवरात घटनास्थळावर घेऊन आले असता शेलू पोलिसांनी वन्यजीव विभाग कर्मचारी यांच्या मदतीने घटनास्थळा वर घेऊन जाऊन तिने मृतक अर्जुन चा मृतदेह पोलीसांना दाखविला. व दुसरा आरोपी ज्ञानेश्वर उर्फ माऊली आहेलाजी डुकरे वय २४ रा. खेरूळा ता. पाथरी जी. परभणी यांच्या मदतीने मृतक अर्जुनचा गळा आवळून खून केल्याचे सांगितले. मृतक व आरोपी यांनी लोणार सरोवर फिरायला जाण्याचा बेत आखला २ आगस्ट रोजी स्कुटीने लोणार सरोवरात आले.आरोपी महिला अर्चना समोर आली नंतरदुसरा आरोपी मृतक अर्जुन रोडगेचा मृत्यूदेह दर्गा रोडवर असलेल्या चिंचेच्या झाडा समोरील जाळीत फेकून मागून येऊन स्कुटीने आपल्या गावी निघाले असता मंठा तालुक्यातील ढोकसाळ येथे आरोपिणी आपली विना नंबर गाडी तेथे सोडून दिली. व खाजगी वाहणाने आपल्या गावी गेले.दि. ६ आगस्ट रोजी सकाळी शेलू पोलीस पथकाणे मृतक अर्जु रोडगे यांचा मृत्यूदेह सरोवरातून वर आणून शववीछदना साठी लोणार ग्रामीण रुग्णालयात आण्यात आला होता.आरोपी वर खुनाचा गुन्हा दाखल करून पुढील तपास पीएस आय अशोक जटाळ, एपी आय संजय चव्हाण, प्रमोद देशमुख, पोलीस कर्मचारी अजय रासकटला, मनोहर कोपणार, सोपान दुबे, अनिल शेवाळे, माधव गोरे, इब्राहिम शेख, अमोल वाडेकर हे करीत आहे.

# वालसावंगी येथे युवकांचे कौतुकास्पद कार्य अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्त लावले ५० झाडें

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी । कौतिक हिवाळे**

येथील सुशिक्षित युवकांनी एकत्र येऊन अण्णाभाऊ साठे यांची आगळीवेगळी जयंती साजरी केली असून येथील मातंग समाज स्मशानभूमीत वेगवेगळ्या जातीचे एकूण ५० झाडांची लागवड केली.या वेळी दादाराव खरात, राजू खरात, राजू बावसकर, साहेबराव खरात, किशोर खरात, सागर निकाळजे,यांनी श्रम दान केले.

**यावर्षी उन्हाळ्यात तापमान ४५ अंश सेल्सिअस पेक्षा जास्त गेले होते. आणि हे तापमान कोणीही थांबू शकत नाही या तापमानात घट फक्त झाडेच करू शकतात म्हणून आम्ही हा झाडें लावण्याचा निर्णय घेतला. यावर्षी ५० झाडांची लागवड केली. आणि यांचा संगोपन करण्याची जबाबदारी सुद्धा आम्ही स्वीकारली आहे (कपिल बावस्कर युवक वालसावंगी)**



# कैलाश सत्यार्थी चिल्ड्रेन्स फाऊंडेशनकडून जि.प.प्रा.शाळा पिंपरी दुमाला येथे वाचनालयासाठी पुस्तकांची उपलब्धता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनापासून पाठ्यपुस्तकासोबत अवांतर पुस्तक वाचनाची सवय निर्माण होणे आवश्यक आहे,त्यासाठी आवश्यक साहित्याची पूर्तता करणारे कैलाश सत्यार्थी फाउंडेशन चे कार्य प्रेरणादायी असल्याचे मत अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, शिरूर चे अध्यक्ष राहुल चातुर यांनी सदर कार्यक्रमच्या निमित्ताने व्यक्त केले आहे.



कैलाश सत्यार्थी चिल्ड्रेन्स फाउंडेशन,नवी दिल्ली या संस्थेच्या वतीने जिल्हा परिषद शाळा पिंपरी दुमाला व परिसरातील ४० शाळांना वाचनालय उपलब्ध करून देण्यात आले आहे. या वाचनालयातील पुस्तकांच्या वितरण प्रसंगी संस्थेच्या प्रतिनिधींचा सन्मान करण्यात आला.जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी अवांतर वाचनाच्या पुस्तकांची आवश्यकता असल्याचे निरीक्षण बालकुमार साहित्य संस्थेने नोंदवले होते, त्याविषयीची मागणी या संस्थेकडे करण्यात आली होती.कैलाश सत्यार्थी फाऊंडेशन ही संस्था शिरूर तालुक्यातील चाळीस गावांमध्ये बालविवाह,बाल शिक्षण,बालमजुरी व निराधार बालकांसाठी कार्य करत आहे.या कामाचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांच्या वाचन संस्कृतीचा विकास व्हावा हा उद्देश समोर ठेवून संस्थेने या गावातील शाळांना पुस्तके व खेळाचे साहित्य वितरित केले आहे. प्रमुख पाहुणे शिरूर तालुका ग्रंथालय संघाचे अध्यक्ष विवेकानंद फंड यांनी विद्यार्थ्यांना वाचाल तर वाचाल व वाचन विकासाचे टप्पे याविषयी मार्गदर्शन केले तसेच ग्रंथालयाच्या नोंदी करण्यासंबंधी शाळेतील शिक्षकांना माहिती दिली.वाचनालयासाठी दानशुर व्यक्ती आणि संस्था यानी मदत करण्याचे आवाहन या प्रसंगी करण्यात आले. याप्रसंगी फाऊंडेशनचे प्रोजेक्ट प्रतिनिधी निंबाजी नरवडे,विद्यमान सरपंच महेंद्र डोळस,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शशिकांत चिखले इ. मान्यवर उपस्थित होते .पालकांनी ग्रंथालय मदतीबाबत फाऊंडेशनचे आभार मानले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांताराम शिंदे यांनी केले.

# डॉ.अमोल ढगे यांची भा.ज.पा.युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

भाजपाचे एकनिष्ठ युवा कार्यकर्ते डॉ.अमोल बालाजीराव पाटील ढगे यांची परवाच युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वात देशाचे पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांच्या विचारास प्रेरित होवून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, संघटन मंत्री संजय कोडगे, राज्याचे नेते खा.अशोकरावजी चव्हाण, लोकनेते मा. खा. प्रतापराव पा. चिखलीकर, खा.अजीत गोपछेडे सर्व वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली नायगांव विधानसभेचे धड़ाडीचे युवा नेते डॉ. अमोल पाटील ढगे यांची भारतीय जनता पार्टीच्या युवामोर्चा प्रदेश सचिव पदी निवड करण्यात आली.डॉ.अमोल पा. ढगे हे उमरी तालूक्यातील अब्दुल्लापुर वाडी येथिल रहीवासी असुन मागील सहा ते सात वर्षापासुन भारतीय जनता पार्टीमध्ये पक्ष संघटनेचे व पक्षवाढी सोबतच समाजसेवेत अधिकचा वेळ घालवनार नेतृत्व म्हनजे डॉ. अमोल पाटील ढगे होय अशी छाप मतदार संघात निर्माण केले. भाजप पक्षाचे आमदार राजेश पवार हे पक्षाचे आमदार राहून सुधा ते कधी



कोरोना काळात जनतेला मदतीचा हात दिले नसून मात्र डॉ.अमोल ढगे हे कोरोनाच्या काळात जेव्हा जगावर संकट आले होते तेव्हा आधार म्हणून तालुक्यातील गरजूंना एक हात मदतीचा म्हणून आरोग्य किट, राशन किट असे तब्बल एक महीना सतत दररोज उमरी तालूक्यातिल प्रत्येक गावागावात राबवले होते. पक्षाने त्याच्या या कामाची दखल घेत मा.खा.चिखलीकर व तत्कालीन जिल्हाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांनी भाजपाच्या युवक विद्यार्थी जिल्हाध्यक्ष पदी निवड करून समाज सेवेत राहून

भाजपाचे बळ वाढवविण्याची संधी दिली.

डॉ.अमोल ढगे यांनी युवक जिल्हाध्यक्ष पद पाच वर्ष भोगले त्यात अनेक शिबीरांचे आयोजन विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग डॉ. ढगे यांचा आसायचा.

२०२३ च्या उमरी तालुक्यातिल बाज़ार समीतीच्या निवडनूकित भारतीय जनता पार्टी विरुद्ध महाविकास आघाड़ीला एकटच्यानेच लढा दिले.नायगाव विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पक्षाचे आमदार राजेश पवार हे राहून पक्षातील कार्यक्रत्यांना कुठेच संधी न देता व सोबत घेऊन मतदार संघात कुठली ग्रामपंचायत असो,कि सेवा सहकारी सोसायटी असो किंवा तिन्ही तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती असो भारतीय जनता पक्षाकडुन पॅनल कुठेच उभे केले नाही हे विशेष मात्र होय.ऐवढेच नाही तर आमदार या नात्याने उमरी, धर्माबाद व नायगाव तालुक्यातील कोणत्याच कार्यक्रत्याना तु हे निवडणूक लढव मी सोबत आहे माझे पाठबळ देतो असे कधीच कार्यक्रत्यांना साथ दिले नसून आ.पवार आमदार म्हणून निवडून एकदा आले तेव्हापासून पक्षातील एकाही कार्यक्रत्याना जवळ केलेच नाही कधी साथ दिलेच नाही ते तर सोडाच स्थानिक स्वराज्य संस्थेवर भाजप पक्षाकडून कोणतीच निवडणूक लढवली नाही.पाच वर्ष नॉट रिचेबल हे आमदार भाजप पक्षाला घातक असून पैशाची मस्ती दाखवत त्या पैशाच्या जोरावर ना ग्रामपंचायत ना.सोसायटया,ना बाजार समित्या ना जिल्हा परिषद, ना.पंचायत समिती,फक्त आपली आमदारकीच बरी बुवा अशी दाखवत ऐन विधानसभा निवडणूक जवळ येताच आ.राजेश पवार यांच्या कार्यप्रणालीवर मुळे पक्षाचे एकनिष्ठ निष्ठावंत सर्वच कार्यकर्ते बाजुला जाऊन दुरावल्याने आता फक्त आ.पवार यांच्या संपत्तीच्या पैशावर डोळा ठेवून असलेले मतदारसंघातील भुरटे कार्यकर्ते आ.पवार हे जवळ करून मतदार संघात तोंड वर काढले. माञ वाघाचे पिल्लू तो वाघच असे दाखवत डॉ.अमोल ढगे हे न डगमता उमरीच्या बाजार समितीच्या निवडणुकीत बलाढ्य महाविकास आघाडीच्या विरुद्ध एकट्यानेच पॅनल उभे करून लढा दिल्याने डॉ.अमोल ढगे यांनी तालूक्याच्या इतिहासात आपली भाजप पक्षाकडुन नोंद केली हे ही विशेष होय. त्यांचीच नोंद भाजप पक्षानी घेत डॉ. अमोल पाटील ढगे यांना भारतीय जनता पार्टीचा अंग मानल्या जाणाऱ्या युवा मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी नियुक्ति करून सर्व सामान्यास न्याय देणारी पार्टी असे सिद्ध झाले. डॉ.अमोल पाटील ढगे हे भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी निवड झाल्याने नायगाव विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय भावी आमदार व भाजपाचे नेते मारोतराव पाटील कवळे गुरूजी यांनी कौतुक करून अमोल पाटील ढगे यांना शुभेच्छा दिले यासह पक्षातील वरिष्ठांनी डॉ. ढगे यांना पुढ़िल वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# दुसऱ्यासाठी जगला तो खऱ्या अर्थाने जगला या संतांच्या शिकवणी प्रमाणे धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर हे जीवन जगत- डॉ.अर्जुन मापारे

## ४७ व्या महिन्याच्या कायापालट उपक्रमात ॲड.ठाकूर यांनी ९२ भ्रमिष्टांची कटींग दाढी केल्यानंतर स्नान घालून नवीन कपडे, चहा फराळ व शंभर रुपयांचे बक्षिस दिले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी घेण्यात येणाऱ्या कायापालट उपक्रम पाहण्यासाठी डॉ. मापारे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी बोलताना डॉ. मापारे असे म्हणाले की, समाजसेवा क्षेत्र म्हटले की,एकच नाव समोर येते ते म्हणजे दिलीपभाऊ ठाकूर यांचे. शंभरच्या आसपास उपक्रम ते सातत्याने राबवत असल्यामुळे करावे तितके कौतुक कमी आहे. यापुढे दरमहा भ्रमिस्टांच्या तपासणीसाठी मी येणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली.भाजपा नांदेड महानगर, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल,अमरनाथ यात्री संघ, सन्मित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कायापालट उपक्रम अखंडित पणे घेण्यात येतो.यासाठी खा.अशोकराव चव्हाण,माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, खा.डॉ. अजित गोपछडे, मराठवाडा प्रदेश संघटन मंत्री संजय कोडगे,महानगराध्यक्ष दिलीप कंदकुर्ते,भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डे व ड.



किशोर देशमुख,ला. योगेश जैस्वाल यांचे मार्गदर्शन मिळत असते. सोमवारी पहाटे शहरातील विविध भागातून भ्रमिष्ट, कचरा वेचणारे, अपंग, बेघर नागरिकांना सुरेश शर्मा,संजयकुमार गायकवाड, शिवा लोट यांनी स्वतःच्या दुचाकी वर बसवून गोवर्धन घाट पुलाखाली आणले. स्वयंसेवक राजूअण्णा पस्पुनुर यांनी सर्वांची काळजीपूर्वक कटिंग दाढी केली.कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुरेश लोट यांच्या सहकार्याने स्नान करण्याची व्यवस्था करण्यात आली. कित्येक दिवस आंघोळ न करणाऱ्या या नागरिकांना निलेश याने साबण लावून स्नान घातले.सुप्रसिद्ध त्वचारोग तज्ञ डॉ. अर्जुन मापारे, डॉ. दि.बा.जोशी, गुरुसिंह चौहान यांच्या हस्ते सर्वांना अंडरपॅन्ट, बनियन व पॅन्ट शर्ट वाटप करण्यात आले. ही भ्रमिष्ट मंडळी कायापालट होण्यासाठी तयार व्हावी म्हणून शंभर रुपयाची बक्षिसी व चहा फराळाची व्यवस्था केली होती.पूर्वीचे मळके कपडे,अवास्तव वाढलेले केस आणि नंतरची चकाचक करण्यात आलेली कटिंग दाढी व नवीन कपडे घातल्यामुळे उपेक्षितांचा झालेला कायापालट पाहून त्यांना स्वतःला नवल वाटले. डॉ. दि.बा. जोशी,डॉ. अर्जुन मापारे यांनी आजारी असलेल्या व्यक्तींची तपासणी करून मोफत औषधे दिली. याशिवाय जखमी असलेल्यांची मलमपट्टी केली. उपक्रम संपल्यानंतर गोवर्धन घाट परिसराची स्वच्छता करण्यात आली. दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी कायापालट हा उपक्रम राबविण्यात येत असल्यामुळे अशा बेघर व्यक्ती आढळल्यास सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या रविवारी त्याची माहिती द्यावी असे आवाहन संयोजक दिलीप ठाकूर यांनी केले आहे.

# सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल गिऱ्हे यांचा उपोषणाचा ६ दिवस

## प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

आष्टी तालुक्यातील चोभानिमगाव येथिल सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल गिऱ्हे गेल्या सहा दिवसापासून गावठाण मोजणी व शिवरस्ते साठी प्रशासनाला कळवून चोभानिमगाव येथे उपोषण करीत आहेत.

याविषयी सविस्तर माहिती अशी की, राज्यातील गावोगावी गावठाणातील व शासनाने संपादित केलेल्या जमिनीवर मोठ मोठ्या लोकांनी मनगट शाहीने शासनाचे क्षेत्र व गावठाणातील क्षेत्र ताब्यात घेतले आहे.सदरील शासनाच्या क्षेत्राचा उपयोग हा सर्वसामान्य साठी असून त्याचा उपयोग लोकांना घेता येत नाही त्यामुळे सर्व शासकीय मालकीच्या जमिनीची संपूर्ण मोजणी १९३० सारखी पूर्ववत करणे आवश्यक आहे.राज्यातील जमिनीचे संयुक्त मोजणी व गावठाण मोजणी व्हावी या मागणीसाठी जमाबंदी संचालक पुणे यांनाही निवेदन दिले व या निवेदनावर कुठलीच कारवाई न झाल्याने आष्टी तालुक्यातील




सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल गि-हे यांनी १ ऑगस्ट पासून आमरण उपोषणाला सुरूवात केली आहे. त्यांनी जमाबंदी संचालक पुणे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की मी चोभानिमगांव येथील रहिवासी असून शेतजमीन असून शेजारील लोकांनी अतिक्रमण केले असून माझे जमिनीच्या क्षेत्राच्या सर्वे नंबर बांध हे जुन्याकाळी सहा-सहा फुटाचे होते. त्यावेळी मला शेतात येण्या-जाण्या साठी रस्ता उपलब्ध होता परंतु अलीकडील काळामध्ये सहा फुटाचा बांध कोरून अतिक्रमण करून जमिनीवर अतिक्रमण करण्याच्या तयारीत आहेत. तसेच गावातील व राज्यातील हीच परिस्थिती आहे गावोगावी गावठाणातील व शासनाने संपादित केलेल्या जमिनीवर मोठ्या लोकांनी मनगटशाहीने शासनाचे क्षेत्र व गावठाणातील क्षेत्र ताब्यात घेतले आहे सदरील शासनाच्या क्षेत्राचा उपयोग हा सर्वसामान्य जनतेसाठी असून त्याचा उपयोग सामान्य लोकांना घेता येत नाही त्यामुळे सर्व शासकीय व स्वतःच्या मालकीच्या जमिनी संपूर्ण मोजणी १९८० मध्ये झालेली होती त्यानंतर १९३० मध्ये अमलात आली होती त्याकरता महाराष्ट्र शासनाने पुन्हा १९३० सारखी पुर्ववत मोजणी करणे आवश्यक आहे.त्यामुळे राज्यातील सर्व पिडीत जनतेस न्याय मिळेल त्यामुळे महाराष्ट्र शासनाने पुन्हा संयुक्त मोजणी करून महसूल अधिनियमनुसार करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल गि-हे यांनी केली असून यासाठी १ ऑगस्ट पासून चोभानिमगांव येथे आमरण उपोषण सुरू केले आहे आज त्यांचा ६ दिवस असून प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप शिवक्रांतीचे प्रदेशाध्यक्ष दिपक सोनवणे केला आहे.यावेळी तात्या सोनवणे,रविंद्र महाडिक,प्रवीण सापते,रेवन्नाथ राऊत भरत गि-हे, इस्लाम सय्यद,माणिक सरोदे, मधूकर गि-हे, सुनिल गि-हे,गणेश गाडे व यांच्यासह ग्रामस्थांनी पाठिंबा दर्शवला.

### पाटोदा येथून परळी, गंगाखेड, नांदेड कडे जाणाऱ्या

# सर्व बस गाड्या चाकरवाडी फाटा या ठिकाणी थांबवण्यात याव्या-नगरसेवक सतीश घोलप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथून परळी, गंगाखेड, नांदेड कडे जाणाऱ्या सर्व बस गाड्या चाकरवाडी फाटा या ठिकाणी थांबवण्यात याव्यात अशी मागणी पाटोदा नगर पंचायतचे नगरसेवक सतीश घोलप यांनी निवेदनाद्वारे पाटोदा आगार प्रमुख यांच्या कडे केली आहे. सतीश घोलप यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की चाकरवाडी हे विसाव्या शतकातील महान संत माऊली महाराज यांचे मोठे धार्मिक स्थान असून या ठिकाणी संपूर्ण राज्यातून भाविक भक्त दर्शनासाठी येतात. तसेच आपल्या पाटोदा परिसरातून देखील प्रत्येक महिन्याला अमावस्याला यात्रा त्याच प्रमाणे दररोज देखील हजारो भाविक चाकरवाडीला दर्शनासाठी जातात. सध्या श्रावण मास सुरू असून हिंदू धर्मियांच्या या पवित्र महिन्यात मोठ्या संख्येने भाविक भक्त चाकरवाडी येथे माऊली महाराजांच्या समाधी दर्शनासाठी जातात पाटोदा येथून पाटोदा आगाराच्या तसेच इतर आगारांच्या



ज्या बस गाड्या परळी, अंबाजोगाई, केज, गंगाखेड, नांदेड या मार्गावर जातात त्यातील अनेक गाड्या भाविकांनी विनंती केली तरी देखील चाकरवाडी फाटा या ठिकाणी थांबत नाहीत या गाड्या पुढे चार पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या येळंब(घाट) या ठिकाणी थांबतात परंतु एवढे मोठे धार्मिक महत्त्व असलेल्या चाकरवाडी फाट्यावर गाड्या थांबवण्यास चालक व वाहक भाविकांना नकार देतात. त्या मुळे महिला वयोवृद्ध भाविकांचे प्रचंड मोठे हाल होतात या संदर्भात आपण किमान पाटोदा डेपोच्या सर्व गाड्या चाकरवाडी फाट्यावर थांबतील असे आदेश काढावेत. त्याच प्रमाणे पाटोदा मार्गे जाणाऱ्या इतर आगारांच्या चालक, वाहक यांना देखील आपण सूचना देऊन चाकरवाडी फाट्यावर या गाड्या थांबवण्यासाठी आदेशित करावे. श्रावण महिना हा हिंदू धर्मियांसाठी पवित्र असून या महिन्यात भाविकांची होणारी गैरसोय थांबवावी. या निवेदनावर काही कार्यवाही न झाल्यास हा भाविक भक्तांचा अपमान समजून तिव्र आंदोलन करण्यात येईल असा ईशारा नगरसेवक सतीश घोलप यांनी दिला आहे.

# शिक्षण महर्षी माजी आमदार भिमरावजी धोंडे यांच्या वाढदिवसा निमित्त विविध कार्यक्रम

## संत बाळूदेव महाराज विद्यालय मध्ये शालेय क्रीडा स्पर्धा घेऊन वाढदिवस साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील संत बाळुदेव महाराज विद्यालय व महिला महाविद्यालयात येथे माजी आमदार भिमराव धोंडे यांच्या वाढदिवसा निमित्त शाळेचे मुख्याध्यापक बोखारे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय साहित्य व विविध क्रिडा स्पर्धा घेऊन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते स्वामी सानप हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार हमीदखान पठाण, पत्रकार जावेद शेख, प्रेस फोटोग्राफर राहुल सोनवणे यांच्या सह शिवाजीराव गर्जे(भाजपा सरचिटणीस पाटोदा), गणेश शिंदे(व्यापारी), प्रल्हाद सानप, क्रांतीसिंह नाना पाटील माध्यमिक विद्यालय चुंबळीचे मुख्याध्यापक सुनील टेकाडे सर, ह.भ.प.नंदनीताई महाराज, ह.भ.प.गौरीताई भवर महाराज आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते यांचा यथोचित सन्मान करून सर्व विद्यार्थ्यांना माजी आमदार भिमराव धोंडे यांच्या वाढदिवसा निमित्त शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक बोखारे सर यांनी केले. या प्रसंगी उपस्थित वाघ सर, मोहळकर सर, जाधव सर, जोगदंड सर, महिला कॉलेजचे प्राचार्य अविळे सर, नाईकनवरे सर, गर्जे मॅडम, येवले मॅडम, निशिगंध मॅडम, क्षीरसागर मॅडम, राम देसाई, बाबासाहेब चव्हाण, अमोल जाधवर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देसाई सर यांनी केले. कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचे आभार देविदास वाघ सर यांनी मानले.

# 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत गो.सी.गावंडे महाविद्यालयात वृक्षारोपण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

आजच्या युगात वृक्ष संवर्धन काळाची गरज आहे. पर्यावरणाचा ढासळता समतोल लक्षात घेता, संतुलन राखणे आपली जबाबदारी आहे. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून, तसेच स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारत सरकारने एक पेड माँ के नाम उपक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण अभियान हाती घेतले आहे.

या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना गो.सी गावंडे महाविद्यालय, उमरखेड यांच्या माध्यमातून महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले.या अभियानात प्रत्येक नागरिकाने एक झाड आपल्या आईच्या नावाने लावावे व त्याचे संगोपन करावे ही भावना आहे. म्हणूनच, आपण सर्वांनी झाडांचे महत्त्व समजून घेतले पाहिजे आणि त्यांचे संवर्धन केले पाहिजे असे प्रतिपादन प्राचार्यांनी केले, आपण अधिकाधिक झाडे लावावीत आणि जंगलतोड थांबवावी.




आपण आपल्या दैनंदिन जीवनात झाडांचा योग्य वापर करवा आपण आपल्या भावी पिढीसाठी एक हिरवागार आणि स्वच्छ पर्यावरण राखण्यासाठी प्रयत्न करूया असे राष्ट्रीय सेवा योजना मार्फत सांगण्यात आले, वृक्षारोपणासाठी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, वनस्पतीशास्त्र विभाग, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा व सांस्कृतिक विभागाचा सहभाग होता.

कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना च्या माध्यमातून राबविण्यात आला होता व त्यानिमित्त विविध प्रकारच्या विविध प्रजातीच्या वृक्षांची जसे बकुळ, वड, पिंपळ, आवळा, कडुलिंब इत्यादी वृक्षांची लागवड करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेतील बरेच विद्यार्थी कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या सहभागाने वृक्ष लागवड करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधवराव बा. कदम व उपप्राचार्य वरिष्ठ विभाग प्रा. डॉ. व्ही. पी. कदम व प्रा. डॉ.डी. व्ही. तायडे, प्रा. डॉ. के. डी. बोंम्पिलवार व सर्व प्रशासकीय कर्मचारी व प्राध्यापक कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाची आखणी व रूपरेषा कार्यक्रमाधिकारी राष्ट्रीय सेवा योजना प्रो. डॉ. प्रशांत अनासने व कनिष्ठ महाविद्यालयाचे रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एस. इंगळे यांच्यामार्फत करण्यात आले व सोबतच महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा सुद्धा सहभाग होता. वृक्षारोपण कार्यक्रमात प्रा. डॉ. के. एस. सोनटक्के, प्रा. डॉ. एस. एम.चेडे, प्रा. डॉ. एस. व्ही. सुर्वे, श्री. रामेश्वर बावसकर, श्री. दीपकभाऊ पातुरकर, श्री. लक्ष्मण, श्री.दोडके यांचे विशेष सहकार्य लाभले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904